☎- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☎ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / /पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 15/09/2025

# श्री गणेशोत्सव विसर्जन व ईद ए मिलादुन्नबी सण–उत्सव शांततेत संपन्न...

श्री गणेशोत्सव तसेच ईद ए मिलादुन्नबी बंदोबस्त अनुषंगाने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी **मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत ठिक ठिकाणी शांतता कमिटीच्या बैठका घेवून शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले होते.

श्री गणेशोत्सव विसर्जन बंदोबस्त शांततेत पार पाडावा यासाठी नांदेड जिल्हयातील महत्वाचे सर्व ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात आला असुन कोणताही अनुचित प्रकार होणार याकरीता संयुक्त सेक्टर पेट्रोलींगचे नियोजन करण्यात आले होते. तसेच विसर्जन बंदोबस्ता दरम्यान महत्वाचे सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत व श्रीगणेश विसर्जन शांततेत पार पडावे याची सर्वोतोपरी काळजी घेण्यात आली. श्री गणेश विसर्जन बंदोबस्त कामी नांदेड शहर व ग्रामीण भागातील बंदोबस्ता करीता पुढील प्रमाणे अधिकारी व अंमलदार तसेच होमगार्ड नेमण्यात आले.

1) मा. पोलीस अधीक्षक नांदेड, 2) अपर पोलीस अधिक्षक–**02** 3) उप विभागीय पोलीस अधिकारी –**10** 4)पोलीस निरीक्षक–**37** 5) सपोनि/पोउपनि–**208** 6) पोलीस अंमलदार–**2556** 7) आरसीपी प्लाटून–**05** 8) एसआरपीएफ–**03** कंम्पनी 9)पुरूष होमगार्ड–**1305**

नांदेड जिल्हयामध्ये दिनांक 27.08.2025 ते दिनांक 06.09.2025 दरम्यान एकुण **3719** श्री गणेश मंडळाची स्थापना करण्यात आल्या. संपुर्ण नांदेड जिल्हयात जवळपास सर्व श्री गणेश विसर्जन मिरवणुका डिजे मुक्त वातावरणात पार पाडण्यात आल्या. श्री गणेशउत्सव काळात एकुण 1208 आरोपीतांना कलम 163 बीएनएसएस अन्वये नोटीस देण्यात आल्या. जिल्हयातील जवळपास 500 गावांत एक गाव एक गणपती उपक्रम राबविण्यात आला. नांदेड जिल्हयातील विना डिजे श्री गणेश विसर्जन मिरवणुक काढणाऱ्या 300 पेक्षा अधिक श्री गणेश मंडळांचा पोलीस अधीक्षक कार्यालया तर्फे सत्कार करण्यात आला.

**मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक**, नांदेड, मुस्लीम समाजाचे मरकज मिलाद कमिटीचे पदाधिकारी व मुस्लीम धर्मगुरू यांचेमध्ये मिरवणूकी बाबत सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती नांदेड शहरातील ईद–ए–मिलादुन्नबीची मुख्य मिरवणुक दिनांक 05.09.2025 रोजी ऐवजी दिनांक 08.09.2025 रोजी होणार असल्या बाबत मुस्लीम समाजाचे मरकज मिलाद कमिटीचे पदाधिकारी व मुस्लीम धर्मगुरू यांनी जाहिर केले होते.

त्या अनुषंगाने दिनांक 08.09.2025 ते दि. 14.09.2025 या कालावधीत संपुर्ण नांदेड जिल्हयात ईद ए मिलादुन्नबीच्या एकुण 41 मिरवणुका शांततेत पार पडल्या असुन कोणताही अनुचीत प्रकार घडला नाही.

नांदेड जिल्हयात श्री गणेशोत्सव व ईद ए मिलादुन्नबी बंदोबस्त कामी नेमण्यात आलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अतिशय शिस्तबध्दपणे बंदोबस्त करून जिल्हयात कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत सर्वतोपरी काळजी घेतली. विशेष बाब म्हणजे नांदेड जिल्हयातील सर्व नागरीकांनी पोलीस प्रशासनांनी दिलेल्या सुचनेचे योग्य पालन केले, वेळेचे बंधन काटेकोरपणे पाळून सर्व धर्माचा आदर करून दोन्ही उत्सव शांततापुर्वक साजरे केले त्याबद्दल **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी नांदेड जिल्हयातील सर्व पदाधिकारी व नागरीकांचे अभिनंदन करून आभार मानले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड